Email

पोलीस महासंचालक कार्यालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई - ४०० ००१.
E mail- desk23.dgoffice@mahapolice.gov.in

क्र.पोमसं /२३/५४/पो.अधिकारी बदली समारंभ/७६/२०२४, मुंबई, दि.२९ /०२/२०२४

**पोलीस महासंचालक यांचे स्थायी आदेश क्रमांक - ०२ / २०२४**

**विषय :- बदली झालेल्या पोलीस अधिका-यांच्या सन्मानार्थ आयोजित करण्यात येणा-या निरोप समारंभ (Felicitation / Send Off) बाबत.**

*****

महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील विविध दर्जाच्या पोलीस अधिकारी / अंमलदार यांच्या शासन नियमानुसार तसेच प्रशासकीय कारणास्तव बदल्या होत असतात. बदली (Transfer) ही एक नित्याची बाब (Routine Procedure) आहे. अशा एका घटकातुन / ठिकाणाहुन दुस-या घटकांत / ठिकाणी बदली झालेल्या पोलीस अधिकारी यांच्या सन्मानार्थ विविध पोलीस ठाणे / शाखांमध्ये निरोप समारंभ आयोजित केले जातात. अशा समारंभांमध्ये संबंधीत पोलीस अधिकारी हे पोलीस गणवेष परिधान केलेला असतांना त्यावर रंगीत फेटे बांधणे, त्यांच्यावर फुलांचा अति प्रमाणात वर्षाव करणे, त्यांना वाहनात बसवुन संबधीत पोलीस ठाणे / शाखेच्या अधिकारी / अंमलदार यांनी वाहनास दोरीने ओढत नेणे असे प्रकार निदर्शनास आले आहेत. तसेच त्यांना शासकीय वाहनात बसवुन सेवानिवृत्त होणा-या अधिका-यांसारखा त्यांना निरोप दिला जातो. असे प्रकार पोलीस दलाच्या प्रमाणीत कार्यपध्दतीला अनुसरुन नाही.

२. अशा प्रकारच्या गौरव सोहळयाचा कार्यक्रम अधिकारी स्वत: किंवा त्यांच्या हस्तकामार्फत स्वस्त प्रसिध्दी मिळविण्यासाठी सोशल मिडीयावर प्रसारीत करतात. त्यामुळे उलट ते जनमाणसात चेष्टेचा / उपहासाचा विषय बनतात. स्थानिक नागरिक हे अधिका-याने केलेल्या चांगल्या कामांचा / कर्तुत्वाचा नेहमी सन्मान करतात, न की अशा दिखाव्याचा.

३ तरी, सर्व पोलीस घटक प्रमुखांनी त्यांच्या कार्यक्षेत्रांतर्गत पोलीस ठाण्यांमध्ये / शाखांमध्ये बदली झालेल्या पोलीस अधिकारी यांच्या बदलीचा निरोप समारंभ आयोजित करतांना वरील प्रकार होणार नाहीत याची कटाक्षाने दक्षता घेणे आवश्यक असुन आणि तशा सुचना त्यांचे अधिनस्थ सर्व पोलीस ठाणे / शाखा प्रभारी अधिकारी, सर्व पर्यवेक्षीय अधिकारी यांना सक्त सुचना देणे आवश्यक आहे.

२/-

Scanned by CamScanner

४ उपरोक्त सुचनांकडे दुर्लक्ष केल्यास / पालन करण्यात कसुरी केल्यास संबंधीतांविरुध्द कडक कारवाई करण्याची जबाबदारी सर्व घटक प्रमुख व त्यांचे पर्यवेक्षीय अधिका-यांची असेल. तसेच अशी कुठलीही बाब पोलीस मुख्यालय यांचे निदर्शनास जर आली तर संबंधीत घटक प्रमुख यांना जबाबदार ठरविले जाईल.

र० शुक्ला
(रश्मि शुक्ला)
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक, आस्थापना / का.व सु. / नि.व स. / प्रशासन / विशेष कृती / ना.ह.सं. / प्रशिक्षण व खास पथके/ वाहतूक / आर्थिक गुन्हे शाखा / फोर्स वन / महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग / रा.रा.पो.बल, म.राज्य,मुंबई
संचालक, पोलीस दळणवळण व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, आस्थापना / का.व सु. / प्रशासन / वि.सु.वि.,म.राज्य, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, पुणे / नक्षल विरोधी अभियान,नागपूर
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल,पुणे / नागपूर.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
सर्व पोलीस अधीक्षक
उप संचालक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.- १ ते १९.
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये.
प्राचार्य, अपारंपारिक अभियान, प्रशिक्षण केंद्र, नागपूर
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. १ ते ४४.
निवड नस्ती (कार्यासन क्र. २३)

Scanned by CamScanner